| MHKO050068362023 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | १५/१२/२०२३. | | |
| | नोंदणी दिनांक | :- | १६/१२/२०२३. | | |
| | निकाल दिनांक | :- | ०३/०७/२०२६. | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | :- | ०२ | ०६ | १९ |

**इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी आर. डी. खराटे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३१०३/२०२३.**
**निशाणी क्र.२३/ब.**

महाराष्ट्र सरकारतर्फे, }
शहापूर पोलिस ठाणे, कोल्हापूर, } **अभियोग पक्ष.**
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर }

**विरुध्द**

दर्शन बाळू रुग्गे, }
व.व.२८, व्यवसाय – काही नाही, } **आरोपी.**
रा.रुग्गे मळा, इचलकरंजी, }
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. }

---

अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ : श्रीमती एम.पी.शेटे.
आरोपीतर्फे विधिज्ञ : श्री.व्ही.एम.सुतार.

---

**न्या य नि र्ण य**

(दि.०३ जुलै २०२६ रोजी अधिघोषित.)

आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

२. दि.११/०२/२०२३ रोजी १४.०० वाजताच्या सुमारास कबनूर गांवातील पंचगंगा साखर कारखाना-शहापूर रस्त्यावरील खंडोबा मंदिराजवळ, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील ह्युंडाई व्हेन्यू चारचाकी नोंदणीकृत क्र.एमएच-०९-जीए-५८७८ हे वाहन हयगयीने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवून पादचारी फिर्यादी कमल अशोक टेके यांना पाठीमागून जोराची धडक देऊन त्यांना गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला अशा स्वरुपाची फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गु.र.नं.३९/२०२३ भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नोंदविला. गुन्ह्याचा तपास पो.ना.श्री.एम.बी.कांबळे यांनी केला. त्यांनी तपास पुर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी दि.०६/०३/२०२४ रोजी आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये आरोपीचे निवेदन **नि.क्र.७** नोंदविले. त्यातील मजकूर आरोपीस त्याचे भाषेत वाचून व समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व खटला चालवण्याची मागणी केली. मुळ फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.१९** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज व फिर्यादी यांनी **नि.क्र.२१** वर पुरावा बंद व सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल करुन प्रकरण तडजोड करण्यासाठी परवानगी मागितली. परंतु, प्रकरणातील भा.दं.वि.सं.कलम २७९ हा गुन्हा तडजोडपात्र नसल्यामुळे परवानगी नाकारण्यात आली.

५. आरोपी विरुध्द प्रथमदर्शनी पुरावा आला असल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब **नि.क्र.२२** वर नोंदविण्यात आला.

६. अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.एम.सुतार यांचा युक्तिवाद ऐकला.

७. खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले, कारणांसह त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि.११/०२/२०२३ रोजी १४.०० वाजताच्या सुमारास कबनूर गांवातील पंचगंगा साखर कारखाना-शहापूर रस्त्यावरील खंडोबा मंदिराजवळ, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील ह्युंडाई व्हेन्यू चारचाकी नोंदणीकृत क्र.एमएच-०९-जीए-५८७८ हे वाहन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल किंवा इतरांच्या सुरक्षेला धोका होईल अशाप्रकारे हलगर्जीपणे अथवा निष्काळजीपणे चालविले ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन मानवी जीवीतास धोका निर्माण होईल किंवा इतरांच्या सुरक्षेला धोका | **नकारार्थी.** |

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| | होईल अशाप्रकारे हलगर्जीपणे व निष्काळजीपणे चालवून पादचारी फिर्यादी कमल अशोक टेके यांना पाठीमागून जोराची धडक देऊन गंभीर जखमी केले? | |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमूद वाहन सार्वजनिक रस्त्यावर इतरांची सुरक्षितता धोक्यात येणा-या वेगात, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले ? | **नकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

८. अभियोगपक्षाने आरोपी विरूध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी कमल अशोक टेके (सा.क्र.१), विश्वनाथ वसंत व्हनबट्टे (सा.क्र.२), गणेश अशोक टेके (सा.क्र.३) व घटनास्थळ पंच किशोर राजेंद्र म्हेतर (सा.क्र.४) यांना तपासले.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिता</u> :-**

९. अभियोगपक्षातर्फे (सा.क्र.१) कमल अशोक टेके यांनी सरतपासात असे कथन केले की, त्यांना मराठी लिहीता वाचता येत नाही. दि.११/०२/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वा. गंगानगर-शहापूर रोडने ते लता बडवे यांना बोलविणेसाठी पायी चालत जात असताना ते खंडोबा मंदीरासमोर आले. त्यावेळी कारखाना रोडकडून त्यांच्या पाठीमागून चारचाकी गाडी आली व त्यांना धडक दिली. त्यामुळे त्या पडल्या व बेशुध्द झाल्या. त्यानंतर त्यांच्या मुलाला त्यांच्या शेजारच्या मुलाने फोन करुन बोलावून घेतले. त्यानंतर त्या पडलेल्या ठिकाणी त्यांचा सुन व मुलगा आला. त्यानंतर त्यांना जयसिंगपूर येथील पायस हॉस्पीटल येथे नेले. त्यांच्या उजव्या पायाला, उजव्या खांद्याला व डोक्याला मार लागला होता. त्या शुध्दीवर आल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना त्यांचा उजवा पाय गुडघ्याच्या खाली फॅक्चर झाला असून त्याचे ऑपरेशन करायचे आहे असे सांगितले. त्यांना धडक देणारी पांढरी गाडी दर्शन रुग्गे हा चालवित होता. पोलिसांनी त्यांचा जबाब दवाखान्यात नोंदविला. त्यांनी फिर्याद **नि.क्र.९** मान्य केली. सदरचा अपघात आरोपीच्या चुकीने झाला होता.

**१०.** अभियोगपक्षातर्फे (सा.क्र.१) कमल यांनी उलटतपासात हे मान्य केले आहे की, घटना घडली त्यावेळी त्यांनी आरोपीला प्रत्यक्षात पाहिले नाही. त्यांनी हे मान्य केले आहे की, घटनेच्या वेळेस ते व त्यांचे शेजारी सोडून इतर कोणीही हजर नव्हते. विश्वनाथ वनभट्टे हे त्यांचे शेजारी आहेत. त्यांनी हे मान्य केले आहे की, घटनेच्या वेळी विश्वनाथ हे घटनास्थळी हजर नव्हते. त्यांनी हे मान्य केले आहे की, विश्वनाथ वनभट्टे यांनी त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या बाजुने साक्ष दिली. त्यांनी हे मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्यांनी हे मान्य केले आहे की, त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यांनी हे मान्य केले आहे की, त्यांना अपघाताची नुकसान भरपाई मिळालेली आहे. त्यांनी हे मान्य केले आहे की, त्यांना कोणताही साक्षिदार तपासायचा नाही.

**११.** अभियोगपक्षातर्फे (सा.क्र.२) विश्वनाथ वसंत व्हनबट्टे यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, जखमी कमल टेके ह्या त्यांच्या गल्लीत राहण्यास असून ते त्यांना ओळखतात. दि.११/०२/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वा. ते श्रीराम बाल विद्यामंदिर, संजय फाँड्रीजवळ, गणेशनगर इचलकरंजी येथे त्यांच्या मुलांना आणण्यासाठी जात होते. त्यावेळी ते खंडोबा मंदिराजवळ आले असता त्यांना एका बाईला चारचाकी वाहनाने पाठीमागून धडक दिल्याचे दिसले. त्यावेळी ते यादव मेडिकल जवळ होते. त्यांनी सदर अपघात त्यांच्या डोळ्यांनी पाहिला. त्यावेळी त्या महिलेला लागल्यानंतर ती महिला जोरात ओरडली. त्याठिकाणी जावून त्यांनी त्या महिलेला बघितले असता त्यांना ती महिला कमल टेके अशी ओळखीची दिसली. त्यानंतर त्यांनी तिच्या मुलाला फोन केला. तो चारचाकीवाला त्याठिकाणी चारचाकी घेऊन थांबला होता. त्याठिकाणी लोक जमले. त्यांनी त्या चालकाला नांव विचारले असता त्याने त्याचे नांव दर्शन रुग्गे असे सांगितले. ती गाडी ह्युंडाई कंपनीची व्हेन्यू नोंदणीकृत क्र.एमएच-०९-जी.ए.-५८७८ ही होती. त्या महिलेच्या उजव्या पायाला, डोक्याला व खांद्याला उजव्या बाजुने लागले होते. त्यांनी गणेश टेके याला फोन केला असता तो व त्याची पत्नी तेथे आले. तो गाडीचालक जयसिंगपूर येथे पायस हॉस्पीटल येथे आला. त्यांनी जखमीला रिक्षाने त्याठिकाणी नेले. त्यांनी सदर अपघात प्रत्यक्ष पाहिला आहे. आरोपीने कमल टेके यांना पाठीमागून येऊन जोराने धडक दिल्यामुळे सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाला. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली. सदर साक्षिदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला नाही.

**१२.** अभियोगपक्षातर्फे (सा.क्र.३) गणेश अशोक टेके यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, जखमी कमल टेके ह्या त्यांच्या आई आहेत. दि.११/०२/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वा. ते घरी रात्रपाळी करुन झोपले होते. त्यावेळी विश्वनाथ व्हनबट्टे यांचा त्यांना 'तुझ्या आईचा अपघात खंडोबा मंदीरावजळ झाला आहे' असा फोन आला. त्या ठिकाणी जाऊन त्यांनी त्यांच्या आईला पाहिले असता त्यांची आई बेशुध्द अवस्थेत पडली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांची पत्नी आली होती. त्या ठिकाणी चारचाकी गाडी होती व तिचा क्र.एमएच-०९-जी.ए.-५८७८ असा होता. त्या ठिकाणी लोक जमा झाले होते. त्यांच्या आईला डोक्याला, खांद्याला खरचटले होते व उजव्या पायाला लागल्यामुळे त्यांना हलविता येत नव्हते. त्यानंतर रिक्षा बोलावून त्यांच्या आईला जयसिंगपूर येथील पायस हॉस्पीटलमध्ये नेले. त्यावेळी चालक त्यांच्यासोबत दवाखान्यात गेला. त्याचे नांव दर्शन बाळू रुग्गे असे त्यांना समजले. सदर अपघात त्याच्या चुकीने झाल्याचे त्यांना समजले. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली होती. सदर साक्षिदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला नाही.

**१३.** अभियोगपक्षातर्फे (सा.क्र.४) किशोर राजेंद्र म्हेतर यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, दि.१५/०२/२०२३ रोजी ते त्यांच्या कामासाठी गेले असता शहापूर पोलिसांनी त्यांची सही घेतली. कशाचा पंचनामा झाला याची त्यांना माहिती नाही. असे काही घडले नाही की, सदर दिवशी अपघातस्थळाचा त्यांच्या समक्ष पंचनामा केला. ते आरोपीला ओळखत नाहीत. सदर साक्षिदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने सदर साक्षिदाराची अभियोगपक्षातर्फे उलटतपासणी घेण्यात आली. परंतु, सदर साक्षिदाराने त्याच्या उलटतपासात देखील अभियोगपक्षास उपयुक्त ठरतील अशी कोणतीही कथने केलेली नाहीत.

**१४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन पुराव्याचे अवलोकन केले असता याबाबत कायदेशीर बाब पाहता भा.दं.वि.संहितेचे कलम २७९ प्रमाणे **एखाद्या व्यक्तीने त्याच्या ताब्यातील सार्वजनिक वाहन रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन घाईघाईने व निष्काळजीपणाने चालविले** हे शाबीत होणे आवश्यक असते. त्यादृष्टीने याबाबत अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असल्याचे दिसते. त्यामुळे वाहनाची गती तेथील वाहनाच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. सबब, अशा परिस्थितीत आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन कसे चालविले तसेच सदर रस्त्यावर त्यावेळी वाहनाची परिस्थिती कशी होती हे सर्व सविस्तरपणे फिर्यादीने अगर प्रत्यक्षदर्शी साक्षिदाराने त्यांच्या पुराव्यात कथन करण्याचे गरजेचे असते.

**१५.** त्यादृष्टीने अभिलेखावरील पुरावा पाहता असे निदर्शनास येते की, फिर्यादी कमल यांनी न्यायालयासमोर फिर्याद **नि.क्र.९** सिध्द केली असली तरी त्यांनी त्यांच्या उलटतपासात घटना घडली त्यावेळी त्यांनी आरोपीला प्रत्यक्षात पाहिले नसल्याचे व आरोपी आणि त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे तसेच त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादीच्या पुराव्यावरुन घटनेबाबत संशय निर्माण होते.

**१६.** येथे एक बाब प्रामुख्याने नमूद करणे गरजेचे आहे की, सा.क्र.२ विश्वनाथ यांनी जरी त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिल्याचे कथन केले असले तरी फिर्यादी कमल यांनी त्यांच्या उलटतपासात घटनेच्या वेळी विश्वनाथ हे घटनास्थळी हजर नसल्याचे व विश्वनाथ यांनी त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या बाजुने साक्ष दिल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सा.क्र.२ यांच्या मौखिक पुराव्याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच अभियोगपक्षातर्फे सा.क्र.३ गणेश हे फिर्यादी यांचा मुलगा असून सदर साक्षिदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांची साक्ष ही ऐकीव माहितीवर आधारित असल्याचे दिसून येते.

**१७.** अभियोगपक्षातर्फे सा.क्र.४ किशोर म्हेतर हे घटनास्थळ पंच असून त्यांनी अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केलेले दिसून येत नाही. अभियोगपक्षाला वारंवार संधी देऊन देखील त्यांनी तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हा संशयापलिकडे सिध्द होऊ शकला नाही.

**१८.** अभियोगपक्षाचे साक्षिदार व पंच यांच्या साक्षीवर विसंबून सदर घटना घडली असा निष्कर्ष संशयापलीकडे जाऊन काढता येणार नाही. त्यामुळे आरोपीने निष्काळजीपणे, हयगयीने वाहन चालविल्यामुळे अपघात झाला व त्यामध्ये फिर्यादी कमल अशोक टेके ह्या गंभीर जखमी झाल्या या बाबी संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाहीत. तसेच अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.१ ते ४ यांनी त्यांचे पुराव्यात तथाकथीत घटनेच्या वेळेस सार्वजनिक रस्त्यावरील वाहनाची परिस्थिती कशी होती तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन कशा प्रकारे चालविले व आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन चालवताना नेमकी कशा प्रकारे काळजी घेतली नाही याबाबत काही एक स्पष्टपणे कथन केल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत त्यांचा पुरावा पाहता सदर अपघात हा आरोपीच्या चुकीने झाला असे म्हणणे न्यायोचीत होणार नाही. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्यादीचे अवलोकन करता दि.११/०२/२०२३ रोजी १४.०० वाजताच्या सुमारास कबनूर गांवातील पंचगंगा साखर कारखाना-शहापूर रस्त्यावरील खंडोबा मंदिराजवळ,

ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याचे ताब्यातील ह्युंडाई व्हेन्यू चारचाकी नोंदणीकृत क्र.एमएच-०९-जीए-५८७८ हे वाहन इतरांची सुरक्षितता धोक्यात येणा-या वेगात, निष्काळजीपणाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून फिर्यादी कमल टेके यांना गंभीर जखमी केले या बाबी निःसंशय सिध्द होऊ शकल्या नाहीत. याव्यतिरिक्त येथे नमूद करणे गरजेचे आहे की, फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.१९** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज दाखल करुन फिर्यादी यांनी **नि.क्र.२१** वर सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल केली आहे. त्यामुळे आरोपीवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकलेले नाहीत. सदर खटला जरी **फौ.प्र.सं.चे कलम ३२०** प्रमाणे तडजोडीस पात्र नसला तरी एकदंरीत खटल्याचे स्वरुप व उभय पक्षांमधील संबंध पाहता सामाजिक ऐक्य राहण्याचे दृष्टीने अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. सबब, सदर अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला याबाबत कोणताही स्पष्ट, ठोस व विश्वासदर्शक पुरावा न आल्याने अभियोगपक्षाचे सदर खटल्यातील सत्यतेबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३८ व मोटार अपघात कायदा कलम १८४ अन्वये खालील आरोप निःसंशयपणे सिध्द होत नाहीत. त्यामुळे **मी मुद्दा क्र.१ ते ३ ला नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता :-**

**१९.** वर नमूद चर्चेवरुन व सदर प्रकरणात दाखल पुराव्यावरुन स्पष्ट होते की, आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये आरोप अभियोगपक्षाने सबळ व विश्वसनीय पुराव्याने निःसंशयपणे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे वर नमूद निष्कर्षावरुन आरोपी सदर आरोपांतून निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | **आरोपी दर्शन बाळू रुग्गे** यांची भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये खालील आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे रु.१५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार) जामीन द्यावा. |
| न्यायनिर्णय न्यायालयात घोषित करण्यात आला. | |

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.03 17:41:43 +0530

(आर. डी. खराटे)

दि.०३/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी.